नि. फौजदारी खटला क्र. ३०८/२०२२
सरकार विरूद्ध किशोर गजानन व
अन्य एक
**निशाणी ४१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : सिध्दांत प्रवेश मेश्राम
वय : ३४ वर्षे,
धंदा : पोलीस कॉस्टेबल
नेमणुक : दहिहांडा पोलीस ठाणे
राहणार : ह. मु. अकोला, ता. व जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. ०९/०४/२०२२ रोजी मी दहिहांडा पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी मी, ठाणेदार राउत, बिट जमादार गणेश अवचार व वाहन चालक प्रकाश काळे असे गस्त कर्तव्यावर होतो. जमादार गणेश अवचार यांना माहिती मिळाली की, वाळुची ट्रॅक्टरद्वारे अवैधपणे वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीप्रमाणे मी, ठाणेदार राउत, बिट जमादार गणेश अवचार व वाहन चालक प्रकाश काळे आम्ही सर्व दहिहांडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ गेलो. त्याठिकाणी आरोपी क्र. १ हा ट्रॅक्टर चालवतांना दिसुन आला, त्यामुळे जमादार गणेश अवचार यांनी त्याला थांबवले व त्याला वाळु वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली. आरोपीकडे वाळु वाहतुकीचा परवाना नव्हता. त्यामुळे जमादार गणेश अवचार यांनी आरोपी व ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात आणले. सदर ट्रॅक्टर मध्ये अंदाजे रू. ५०००/— किमतीची एक ब्रास वाळु होती. तपास अधिकारी यांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. मी आरोपी क्र. १ ला ओळखतो. तो न्यायालयासमोर हजर आहे. मी आरोपी क्र. २ ला पाहिल्यास ओळखु शकतो. एम एच ३२ ३१२४ असा मिळुन आलेल्या ट्रॅक्टरचा क्रमांक होता. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी** — आरोपीतर्फे वकिल श्री. एफ. ए. काझी यांचे मार्फत.

२. वाळुची ट्रॅक्टरद्वारे अवैधपणे वाहतुक होत आहे, अशी बातमी मिळाल्याची बाब माझे बयानात नमुद नाही. त्यामुळे जमादार गणेश अवचार यांनी आरोपी व ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात आणले असे मी बयान देतांना सांगितले होते परंतु सदर बाब माझे बयानात नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. असे घडले नाही की, मी स्वत: ट्रॅक्टर व आरोपीला घेवुन पोलीस ठाण्यात आलो.

३.  हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०४/२०२२ आरोपी अवैधपणे वाळुची वाहतुक करतांना मिळुन आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. २५.०८.२०२५
अकोट